# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १४८-२३** **दिनांक :- ११/०५/२०२३**

## नालासोपारा, अर्नाळा पोलीस ठाणेत विविध गुन्हयांतील ३३,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल नागरिकांना करण्यात आला परत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-३ हद्दीमधील नालासोपारा, अर्नाळा पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या विविध गुन्हयांतील हस्तगत केलेला एकुण ३३,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल दिनांक १०/०५/२०२३ रोजी पिडीत व फिर्यादी/ तक्रारदार यांना परत करण्यात आला आहे. पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गंभीर तसेच चोरी व घरफोडीसारख्या गुन्हयांची पोलीसांनी कौशल्यपुर्वक उकल करुन फिर्यादी यांचा आरोपीतांनी चोरुन किंवा जबरीने नेलेल्या किंमती वस्तू, गहाळ झालेले मोबाईल हॅन्डसेट इत्यादी गुन्हयाचे तपासादरम्यान हस्तगत करण्यात आला होता.

हस्तगत मुद्देमालामध्ये सोन्याचे दागिने, मोटर सायकल, मोबाईल फोन व गृहउपयोगी वस्तुंचा सामावेश होता. दिनांक १०/०५/२०२३ रोजी सायंकाळी १७:३० वाजताच्या दरम्यान नालासोपारा पोलीस ठाणे येथे घेण्यात आलेल्या मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान पिडीतांना उपरोक्त मुद्देमाल पोलीसांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन परत मिळवून दिल्याने संबंधित पिडीत व फिर्यादी यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांचे आभार मानून आनंद व्यक्त केला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय यांच्या आदेशाने श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विलास सुपे, नालासोपारा पोलीस ठाणे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कल्याणराव कर्पे, अर्नाळा पोलीस ठाणे तसेच संबधित पोलीस ठाणेचे अधिकारी व अमंलदार यांनी केली आहे.


मिरा - भाईदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
नालासोपारा विभाग
मुद्देमाल हस्तांतर कार्यक्रम


मिरा - भाईदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
नालासोपारा विभाग
मुद्देमाल हस्तांतर कार्यक्रम
मा. श्री. चंद्रकांत जाधव
श्री. कल्याणराव कर्पे

-----oooo-----